म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १२८२



# यशवंत टाईप फौंड्री

पटेल बिल्डिंग, १७, आर्देसर दादी क्रॉस लेन,

माधवबाग, मुंबई ४.

आमच्याकडे आधुनिक पद्धतीनें बनविलेला

★ मराठी ★ गुजराती ★ इंग्लिश

टाईप तयार मिळेल.

तसेंच

टाईप कास्टींग करून दिले जातात.

---

## दादर विभागांत उत्कृष्ट छपाईचे ठिकाण

# सुदामा प्रिन्टर्स

●

आमचेकडे मराठी, गुजराथी, व इंग्लिश भाषेची मनपसंत

छपाई आणि बुकबायडींग कामें केली जातात.

●

कामत चाळ, कुंभारवाडा, भवानी शंकर रोड,

दादर, मुंबई २८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक ९६५९७
विभाग 9222
क्रमांक ११३१५४
नों. दि.

# ताज

शिवकालीन महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर
चितारलेली एक कलाकृति

प्रफुल्ल-दत्त

किंमत सहा आणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 6633

१

वेंचुनी जवळचें इंद्राचें ऐश्वर्य
निर्मिलें शहा तूं अतुल शिल्प-सौंदर्य
दिनरात मनींचें जागवितां परि प्रेय
अपुरेच राहिलें भूपालाचें कार्य

२

तव रचलें होतें तक्त हिऱ्या-पांचूंनीं
मन खचलें होतें आणि प्रीतिवांचूनी
दृष्टिपथीं येतां एक दिनीं मुम्ताज
ऐश्वर्य वाकलें आसक्तीच्या चरणीं

३

मुमताज नव्हे, तो इराणचा नवराग
गायिलास उरिंची शमवाया तूं आग
मोहरे परी जे हृदय कामिनी-स्पर्शें
अंगार गमे त्या विरहीं कमल-पराग

४

तव मुठींत होता साम्राज्याचा दण्ड
जिंकिलें जयानें असतें हें ब्रह्माण्ड
प्रीतिच्या चिंतनीं विरघळतां शक्ती ती
तव जीवन ठरलें आसक्तीचा पिण्ड

५

हा महाल त्यांतुनि बांधिलास नसता तूं
जाणिला जगानें नसता जळता हेतू
कौतुकें थोरवी गाइल कुणि शिल्पाची
आवरुनि भावना मनीं म्हणेल परंतू....

६

" परिसरांत होत्या पाषाणाच्या खाणी
खुळखुळत तिजोरींतुनी आणखी नाणीं
शिल्पज्ञ हवे ते हुजुराच्या सेवेस
साकार जाहली म्हणुनि प्रीत पाषाणीं "

७

ती प्रीत खरी जी प्रेरितसे पुरुषार्था
कीर्तिनें आपुल्या जिंकायास दिगन्ता
ती प्रीत खरी जी रंगुनि तेजो-वलयीं
करि अनंत-हस्तें जवळी दीन-अनाथा

८

परि शहाजहाँ ! तव कसली वेडी प्रीत,
कर्तव्य जाहलें मुग्ध जिच्या बंदींत
    अश्रूंची स्मरणी ओढित निमिष-पळास
वर्षानुवर्षे राहिलास बेहोषींत

९

जी तुझी व्हावया कधींहि न स्फुरली, विरली
जी राजेपणही जाणुनि तुज विसरली
    सजलास तिच्या कां लावण्या कवळाया ?
पुरुषार्थ गुणांची बूज न जेथें उरली

१०

लावण्य चुरी पद जेथें पुरुषार्थाचें
शांतीस तया दे सिंहासन वक्षाचें
    तांबूल आणि दे रंगाया एकान्त
    क्षितिजावरि नाचे अक्षय भाग्य तयाचें

११

लाभली शहा ती तुजासि न उत्कट प्रीत
खुरटलें उमलतें भाव तिचे सक्तींत
    महिरल्या मनाची लाभे जरि सुम-शय्या
उतरतील मीलन-राग केंवि उर्मींत ?

१२

" काल-बद्ध करि ही तरिही अपुली प्रीत "
दिनरात आस ही होति तुला जाळीत
    परि ताज नव्हे ! ही कामाग्नीची ज्वाला
शतकानें शमलि न, जळल कालातीत

१३

कुणि पुसे " पाहिला चांदण्यांत कां ताज ?
यमुनेंत शहाचे फुललें भाव-सरोज ? "
मी म्हणे, " काय त्या दिसेल रूप-महालीं
जागते ज्यांत दो भग्न जिवांची शेज ? "

१४

हा बघुनि ताज, मज स्मरते एक कहाणी
गायिली जिच्यावर कुणिहि न अजुनी गाणीं
मातींतुनि फुलल्या दोन जिवांच्या ज्योती
उजळिलें जयांचें जीवन नक्षत्रांनीं

१५

ज्या शिखरावरुनी रायगडाचा राणा
स्वीकारित होता दख्खनचा नजराणा
खोऱ्यांत तयाच्या आहे गोफणगांव
' मुक्तीस्तव मरणें ' हाच जयाचा बाणा

१६

खेड्यांत अजुनि त्या आहे पडका इमला
जो ढळला खचला परतवितां कलिकाळा
त्याच्याच धन्याचें जीवन थयथयतें हें
आसमन्त ज्यानें शतकांतुनि जागविला

१७

त्या शार्दूलाचें होतें नांव जिवाजी
प्राणाहुनि होता प्यार तयास शिवाजी
रक्ताची घेउनि शपथ म्हणुनि शिव-कार्या
शिर ठेउनि हातीं लढला, ठरला गाजी

१८

डौलानें मिरवित तुरा जरी-पटक्याचा
तालांत गात शाहिरी चरण फटक्याचा
    रस्त्यानें जातां सहज जिवाची स्वारी
मानाचा मुजरा मिळवी रति मुरक्यांचा

१९

मिळवाया त्याच्या विशाल उरिंचें तक्त
कामिनी तयावर होत्या किति अनुरक्त
    शांतिच्या दर्शनें ढळे जिवाची शांती
सहवासा तिचिया झाला जीवन-मुक्त

२०

कांतींत शांतिच्या होतें सन्ध्या-राग
विरघळलें होतें अधरीं भाव-पराग
    गति लपली होती चरणीं सारंगाची
उत्फुल्ल उरोजा पेलित अन् कटिभाग

२१

कधिं जातां जिवबा घाटावरती स्नाना
मैत्रिणी शांतिच्या ऐके कुजबुजतांना
    " पाहिलात का तो ? विशाल त्याच्या स्कंधीं
नाचाया झुरते भिरभिरते ती मैना "

२२

न्याहरी घेउनी पित्यास कधिं जातां ती
जिवबाचें जिवलग वाट अडवुनी म्हणती,
    " भिंगरे ! ठेव ती कांदा-भाकर येथें
कां तोंच तुला कस्तुरी, अम्हीं अन् माती ? "

२३

भ्रूभंगें करुनी त्यांना मग घायाळ
घे शांता त्यांचे शब्दार्थावरि झेल
    ती म्हणे, " कृमि तुम्हीं पंकांतिल क्षण जीवी
मी नागिण, अपुलें संबंध न समतोल "

२४

जे बोलत होते शांतीविषयिं हवे ते
वांछीत तिच्याशीं तेंच जिवाचे नातें
    कामिनिचा कलिजा ज्यांस कधीं न मिळाला
प्रीतिच्या पथांवरि अंथरिती ते कांटें

२५

कांहींहि असो ते ! शांति-जिवाची प्रीत
ते राधा-हरिंचें होतें जीवन-गीत
    दुमदुमले मावळ ज्यांतिल वीरश्रीनें
वितळलें जयांतिल लावण्यें नवनीत

२६

ते दिवस प्रीतिचें होतें जरि दोघांचे
श्वासासह अपुलें जीवन विस्मरण्याचें
    ते दिवस तसेंही होते क्रांतियुगाचे
युद्धाच्या ज्वालेवरि जीवन्मरणाचें

२७

ते दिवस जेधवां सहजचि यवन-समीर
राखेपरी उधळीत होतां मावळ-वीर
    त्या जाणिव द्याया शिव-शार्दूल कडाडे
" ही राख न, विभुती ध्वंसिल वेडापीर "

२८

त्या धामधुमींच्या जिंकित चढत्या काळा
शिव-कीर्ती चढली भिडली अस्मानाला
त्याचिया मनीं परि जागत होता हेतू
" कधिं कोण्डाण्यावरि फडफडेल ध्वज अपुला ? "

२९

कोण्डाण्यावरती चढला पडला तान्हा
इतिहास न ठाउक मराठ्यास हा कोणा ?
जिवबाही होता परि त्या झुंजारांत
जाणवला त्याचा शेवट गांवकऱ्यांना

३०

बोलला जेधवां शिवबा, " तूंहि हवास
यश आणाया वा द्याया प्राण पणास
मगरीनें गिळिलें रत्न यावया हातीं
बाहूंत हवे बळ लवविल जें वज्रास "

३१

बोल हें शिवाचें भिडलें उरिं जिवबाच्या
मायेनें भिजल्या हृदयीं रिझली वाचा
उतटले बन्ध अभिमानें अन् वक्षींचें
बोलला, " या क्षणा बन्दा तव हुकुमाचा "

३२

तीरासम तिथुनी तसाच ये वाड्यांत
पितरांस म्हणाला, " पुरा करा मम हेत,
निघणार उद्यां मी शिव-कार्यास पहाटे "
निघणार म्हणाला परि न शांतिची भेट

३३

दिवसाच्या किरणीं रंगत होती सांज
पक्ष्यांच्या नेत्रीं पेंगत होती नीज
शांतीस्तव होतें खंगत हृदय जिवाचे
निमिष-पळा भंगत उत्कटतेचा ताज

३४

धुन्डूनहि तिजला हव्या नको त्या ठायीं
ये पहावया तिज अंतीं शोधित राई
नैराश्यें वदला तेथेंहि न दिसतां ती
" प्रीतिचें पांखरूं येई अपुल्या ठायीं "

३५

न्याहळीत मग तो नभीं तरळत्या मेघा
विसरे कसातरि विरहोत्कट आवेगा
उधळाया लागे जीवन नित्य असेंच
प्रीतिनें ग्रासल्या जिवा साधण्या योगा

३६

हरिणिच्या पाउलें तों ये मागुनि शान्ता
अन् बोले, " खेळे कोण मनीं निशिकान्ता ? "
प्रीतिच्या संभ्रमीं उत्तरला तिजला तो
" मनिं चिंति तिला, जी क्लांत करी रतिभ्रान्ता "

३७

कळवितां जिवानें तिला शिवाचा हेतू
ती वदली, म्हणते जावे मीहि....परंतू....
ह्या रातीं फुलुं दे जागविलेली आस
विरुं देत तियेच्या सौगंधीं मी अन् तूं "

३८

सिंचिली रात ती चंदेरी किरणांनीं
महिरलें जीव तें जीवनिंच्या मधु-स्वप्नीं
उमलत्या उषेच्या गंधित शीतलतेंत
कधिं हरिल्या घटका न कळे निश्वासितांनीं

३९

खणखणे डफासम कर्तव्याची याद
किणकिणे तुणतुण्यापरी प्रीतिची साद
कर्तव्य-प्रीतिच्या उन्मेषें फेसाळे
जे जीवन, त्या ये चिरंतनाचा नाद

४०

उतरतां पहाटे मकरंदाचा कैफ
दलपाशीं राही पडुनि मलूल द्विरेफ
त्यापरी प्रियेच्या उरीं विसावुनि शीर्ष
आठवीत होतां जिवबा प्रणयालाप

४१

कोंबडा जेधवां आरवला परसांत
दहिंवरें जेधवां वसुधा झाली स्नात
रंगवून भैफल चांद गाइ अस्ताई
जागवून तिज तो वदला, " होइ पहाट "

४२

ती तशीच उठली सांवरीत कटिबन्ध
भिवयांत कोंदला होता स्वप्न-सुगन्ध
वक्षस्थल होते रुद्ध कंचुकीवरती
गुंगींतच अपुल्या होता भाव-मिलिन्द

४३

बोलला जिवा मग " हवे अतां जायास
दे निरोप ! चल दे आणिक धीर मनास !
मज नकोस न्हाणूं अश्रूंच्या वर्षावें
चल उजळ कटाक्षें मम जीवन-क्षितिजास ! "

४४

स्मृति-पटलीं आणुनि रति-घटकेच्या साक्षी
कवळिलें शांतिनें जिवास अपुल्या वक्षीं
असमान-तितीर्षा पंखांतिल फुलवाया
बिलगून निमिष तो, भरारला नभिं पक्षी

४५

तो वळतां, वळली शांता माजघरांत
विरचीत जिवाचे विरही भाव उरांत
तम पिढ्या-पिढ्यांचा रिचला होता तेथें
तिज दिसालि भवानी क्रोधित त्या तिमिरांत

४६

लावून तिनें मग समई देव्हाऱ्यांत
धवळिलें देवघर ज्योतीच्या तेजांत
बोलली " आज तुज नवस बोलत्यें आई !
मम प्राण परतु दे, मिळवुनि जय युद्धांत

४७

यश जिवासवें जरि आलें अपुल्या दारीं
घडवीन तुझ्यास्तव सोन्याची अंबारी
पालखींत घालुनि मिरवित तुज थाटानें
हें वदालि न विरली समई तों अंधारीं

४८

हें अशुभ स्वप्न कां अपुल्या भवितव्याचें ?
भीतिनें चित्त या कातरलें शांतीचें ।
    प्रत्यक्ष राहिले युद्ध उभे डोळ्यांत
ऐकिले, " विसर मज शांते ! " बोल जिवाचे

अनुक्रम
विभाग
क्रमांक
दि
वाचनालय

४९

संभ्रमांतुनी तिज निमिषीं येतां जाग
बोलली, " पेटली कां मजभवती आग ?
    भस्मसात करितिल जिवा जरी या ज्वाला
निस्संग राहुनी शांती वरिल विराग "

५०

तुडवीत खपुष्पें उडत्या नक्षत्रांची
उडवीत पाण्यांतील निशा नेत्रांची
    उधळिला जिवानें क्षितिजावरती घोडा
ढालीपरि बांधुनि स्मृति गोफण-गांवाची

५१

    राईंत परंतू येतां त्याचा अश्व
थबकला निमिष तो पाहुनि परिचित विश्व
    जाणितात अपुले-परके जीव मुकेही
रक्षितात नेत्रीं आणि प्रीति—सर्वस्व

५२

उतरला जिवा मग वारूवरुनी खाली
न्याहळिलें त्यानें अवताली—भवताली
    संकेत-कुंज त्या तेथुनि दिसतां दूर
बोलला, हीच त्या वाघिणिची मम जाळी

५३

गुंतलें जरा मन त्याचे त्या जाळींत
मीलनिंच्या घटका फुलवित कुरवाळीत
भालिच्या कुंतलापरि त्या सारुनि मागे
तो जागे, त्याचा कवळी अश्व दिगन्त

५४

विनिमयें मृत्युच्या तोलाया शिव-शद्ब
प्रांगणीं जाहलें होते मावळ स्तब्ध
तेव्हांच थडकला जिवबा जाउनि तेथें
सारेच बघुनि त्या झाले विस्मय-बद्ध

५५

कुणि, हळुंच म्हणाले, " असेल तो हा ताना
जो धजे घ्यावया शिवबास्तव कोण्डाणा
" तो जिवा न ठावा ? " चूक उकलिली कोणी
" शांतिच्या प्रीतिचा एकमेव नजराणा "

५६

कुणि वदला तिसरा " याच्या गोफणगांव
शब्दावरि झुलतो, लाटेवरती नाव
तो गांव घेउनी असेल आला येथें
अरि दुभंगेल उरिं बसतां त्याचा घाव "

५७

वाघापरि घेउनि गर्दीमधुनी झेप
तो उठला फेकित भवती दृष्टिक्षेप
गर्जला, व्हा पुढें तानाजीसम सारे
असुरांच्या वक्षीं द्या वज्राचे लेप

५८

सर्पाशीं झुंजत पिंजत चुंबिन प्राणा
गरुडाचा ज्यापरि जन्मजात हा बाणा
त्यापरी येउं दे रणीं मरण अपुल्यास
आलो तर घेउनि येउं सवे कोण्डाणा "

५९

ते युद्ध न, होते अरे-तुरेचें द्वंद्व
रक्तास्तव होते लोचन त्यांचे धुंद
मनिं ठसला होता शिव-शद्बांचा पीळ
" हांकेस हवी तव एकदिलाची साद "

६०

भडकली झुंज दिवसाच्या चढत्या प्रहरीं
रक्तासह गळल्या करिंच्या किति तरवारी ?
किति दुभंगलें तीरांनीं बुरुज उरींचें
रतिभरही ढळला तरि न जिवा निर्धारीं

६१

घेरिलें तयासहि गनिमानीं माध्यान्हीं
चैतन्य कवाळितो जेंवि चितेंतिल वन्ही
फेकिला तोंच कुणि गर्दीमधुनी भाला
तो भिडतां वक्षीं, विरला जिवबा देहीं

६२

पडलेला पाहुनि जिवबा अपुला जीव
बेभान जाहला अवघा गोफणगांव
वणव्यांत करपुनी जावे जेंवि विहंग
धूळींत मिळालें सारे, नुरलें नांव

६३

आणिले जिवाचे शव गोफणगांवांत
ही वार्ता गेली भंवतीच्या गांवांत
दर्शना तयाच्या जमली पंचक्रोशी
उत्कटता उमले अखेरच्या भावांत

६४

शोकानें झालें सारेजण हतबुद्ध
अश्रूंत बुडाली शांतीची अन् शुद्ध
वेगळे कराया जिवापासुनी तीस
अनुभवें वाकला, उठला त्यांतिल वृद्ध

६५

बोलला कांहितरि, " जिवावरिल ही माया
जा विसरुनि म्हणुनी येइल कां विसराया ?
म्हणतेस प्रीत ज्या, ती तर तुजपाशींच
अंबरीं जरी घन भूवरि त्याची छाया

६६

परि प्रीत जेधवां किनारते शोकानें
नच इतरांच्या ती फुले शब्द स्पर्शानें
निशब्द राहिली शांति उशास शवाच्या
वेड्यापरि, हरिली शांति जिची मृत्यूनें

६७

" भंगल्या जिवाचे जगणें आतां फोल
भंगल्या बिलोरी आदर्शा नच मोल
जागविली ज्यानें सह्याद्रीची खोरी
तो नसतां जिवबा सावरण्या मम तोल

हें जिवावांचुनी जगणें म्हणजे मरणें
अस्मानावांचुनि व्यर्थ घरेंची स्वप्नें
उर ग्रीष्माघातें दुभंगलें धरतीचें
ये भरुनी आषाढांतिल जलधारेनें ”

६९

उधळितां भाव हे चितेवरी जिवबाच्या
स्मृति अधिक भडकल्या अंतरिंच्या शांतीच्या
परतली घरीं ती जळत खचत तरि त्यांत
करपती प्रीतिविण साऱ्या वृत्ति मनाच्या

७०

राईतुनि वाहे महानदी सावित्री
जल बारमासही असते जिचिया पात्रीं
उजळावी सतिच्या चरण-स्पर्शें शीळा
त्यापरी हंसे तिज भवतालील धरित्री

७१

तीरींच तिच्या हो अंत्यविधी जिवबाचा
विधि ज्यांत जळाला मंगल-निधि शांतीचा
ही पहा कशी ती विधि-घटना विपरीत
मोहोर गळावा राईतच प्रीतीचा

७२

त्या घटकेपासुनि घेत जिवाचा ध्यास
शमवाया मनिंचा चिरविरहाचा प्यास
राईत जाइ ती नित्याची सन्ध्येस
ते स्मशान गमलें मंदिर भग्न-जिवास

७३

जिवबाची विभुती धुण्डाळित आभाळीं
तेथील राख ती लावी अपुल्या भाळीं ;
करपल्या स्मृति पुन्हा पालवीत अश्रूनें
कालवल्या हृदयें परते कातरवेळीं

७४

एकांत उमलण्या सावित्रीच्या कांठीं
मधुचरण शांतिनें आळविलें जे ओठीं
त्या घुमत्या राइंत उत्कटतेंतिल ताना
आलाप तयांचे अजुनी कोकिल-कंठीं

७५

आमरण जागली शांती या अभिमानें
" वीराचें जीवन जागविलें मी दानें
माझिया उरींची ऊब, विडा अधरींचा
जाहलें चिरंतन सौभाग्याचें लेणें "

७६

साधीच कथा ही जिवबा अन् शांतीची
रंगली हिच्यांतुनि प्रीत दिव्य कांतीची
धाग्यांतिल हिचिया उत्कटतेचा पीळ
पाहून शिथिलता जावी क्लांत मनाची

७७

असतील कथा किति अशाच गांवोगांवीं
शाहीर कवींनीं कीर्ति जयांची गावी
पाषाणबद्ध परि नाहीं त्यांची प्रीत
ती सहज कुणी वर्णावी, कुणि परिसावी

७८

तिजमुळें जाहलें कोंकण हिरवेगार
पोचली मराठेशाही अटकेपार
घण तिनें हाणुनी बलवंतांच्या वक्षीं
शतकांचें केलें खुलें मुक्तिचें द्वार

७९

हेंच खरे अमुचे सह्यांद्रींतिल ताज
जे बघुनी द्रवली असती मनिं मुम्ताज
अन् वदली असती, “ हवे कशास महाल ”
वेड्यापरि द्याया चिरंतनाला साज ?

८०

प्रीतिनें माझिया अंथरली ज्या शेज
शांतीस्तव ज्याच्या केलें मुक्त उरोज
तो तिथेंच रिझला, विझला, त्याची राख
पाषाणबद्ध जाहली....तोच हा ताज

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ८०३३
ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम २८६९९
विभाग ९७.७१९
९२८२
क्रमांक
नों. क्र. ३७११४
वाचनालय शाखा



उद्यांच्या पिढींतील एक लेखक

# यादव भिकाजी गांगुर्डे

यांचा

लघुकथा संग्रह—

# रेषा—वलयें

— जून १९५४ मध्यें प्रसिद्ध होईल. —

भावनगरी बदाम-पुरीपेक्षां

खमंग नी खुसखुशीत

# डालडांतल्या पुऱ्या

लौकरच प्रसिद्ध होतील.

लेखकः—दा. म. पाणसरे.

CHAPHEKER'S

# EFFICIENCY SERIES

1. Essays, Letters and Paragraphs. 4/-/-
2. A Vade-Mecum of Algebra.
3. A Vade-Mecum of Arithmetic.
4. A Vade-Mecum of Trigonometry. -/5/-
5. सुबोध भूगोल. 1/-/-
6. सुबोध विज्ञान-रसायन सार. 1/8/-
7. A Vade-Mecum of Physics & Chemistry. 1/8/-
8. A Vade-Mecum of Radio-Proportion and Variation. -/10/-
9. The Right Word in The Right Place. 1/8/-

*In the Press*

10. A Vade-Mecum of Grammar.
11. A Spelling Chart.
12. Model Essays in Marathi.

न नांवाजलेलें नाटककार

## श्री. ना. ल. मोरे

यांचीं

# गाजलेलीं नाटकें

REFBK-0008738
REFBK-0008738

★

पारी नाग ( सामाजिक )

★

वीर-प्रतिज्ञा ( ऐतिहासिक )

★

शेतकरी ( स्त्री-पात्रविरहित ग्रामीण नाटिका )

आणि

## पांडवांचा सखा

— लौकरच आपल्या भेटीस येत आहे —

प्र-फु-ल्ल-द-त्त

यांची

# साहित्य-संपदा

लाटा—लहरी ( रुबाया संग्रह )
मृणाल—पत्रें ( कादंबरी )
अशोकाचीं फुलें ( गद्य-गीतें )
पाळण्याची दोरी (नाटिका)
माझा भारत ( „ )
गोमंतक ( „ )

—▣—

: आ गा मी :

**मुग्धा** ( कादंबरी )

— वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांसाठीं —

## एकावन्न

# ललित-निबंध

१ मार्च १९५४ ला प्रसिद्ध होतील.

---

: लेखकाचा पत्ता :

द. वि. तेंडुलकर, एम्. ए., बी. टी.
रुक्मिणी स्मरण १२२
माटुंगा, मुं. १९.

लाखाणी बुक डेपो
गिरगांव मुं. ४.

# श्री. गोपाळ हरी जोशी

बी. ए. ( टिळक ) एस. टी. सी,

★

१ **निबंध, स्वातंत्र्य व जीवन** ( न्यायमूर्ति एम्. सी. छगला यांच्या '**लॉ. लिबर्टी अँड् लाइफ्**' ह्या इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद )

★

२ **श्री. सरदारसाहेब रावबहादुर**
**विनायक महादेव तेंडुलकर ह्यांचें चरित्र**

★

३ **श्री. वासुदेव गणेश रानडे,** एम्. ए., बी. एस्. सी. [ वकील ] अलिबाग. यांचें चरित्र अथवा एका शिक्षण-तज्ञाचा जीवन—वृत्तांत.

★

**4 Glimpses into Life of Dr. Tagore**
[ श्री. **सदाशिव कृष्ण** उर्फ **बाबासाहेब फडके** ह्यांचें नवयुग धर्म ह्या ग्रंथांच्या आधारें ]

★

मुद्रक स्थळ:—सुदामा प्रिंटर्स, कामत चाळ, कुंभारवाडा, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई २८.